ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# बालविकासासंबंधीच्या समस्या आणि बालकांचे सशक्तीकरण



**दत्तात्रय शिवाजी थोरात**
सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)
सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते
ता. माळशिरस, जि. सोलापूर (महाराष्ट्र–भारत)

## ● प्रस्तावना :

बालविकास अत्यंत महत्वाचा व जिव्हाळ्याचा विषय मानला जातो. कोणत्याही देशात लहान मुलांच्या विकासाला महत्व दिले गेले पाहिजे, कारण राष्ट्राचे संपुर्ण भवितव्य त्या राष्ट्रातील बालकांशीच निगडीत झालेले असते. 'राष्ट्राचे भावी आधारस्तंभ' असे लहान मुलांना संबोधले जाते. बालविकास म्हणजे लहान मुलांच्या किंवा बालकांच्या अंगभूत क्षमतेचा पुरेपूर विकास घडवून आणणे किंवा असा विकास घडवून आणण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करणे म्हणजे बालविकास होय.

बालविकासाचे अनेक पैलू सांगितले जातात. त्यामध्ये शारीरिक विकास, बौध्दिक विकास, मानसिक विकास, नैतिक विकास, अध्यात्मिक विकास, भौतिक विकास, सामाजिक विकास, राजकीय विकास या गोष्टींचा समावेश होतो. सर्व मुलांचा या प्रकारे विकास झाला पाहिजे किंवा सर्व मुलांना हक्कांचा लाभ घेता येईल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे, असा संयुक्त राष्ट्रसंघाचा आग्रह आहे. तथापि आज जगात असे अनेक देश आहेत की, तेथील मुलांना अनेक हक्कांपासून वंचित रहावे लागत आहे. विशेषतः विकसनशील देशातील मुले त्याबाबतीत खूपच दुर्दैवी म्हणावी लागतील.

## ● बालकांची भारतातील स्थिती :

भारतासह सर्वच विकसनशील देशातील लहान मुलांना अनेक गंभीर समस्यांशी मुकाबला करावा लागतो. या समस्या इतक्या भयावह आहेत की, त्यांच्याशी झुंजताना मुलांचे बालपण कोमेजले जाते. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मुलभूत गरजांपासून वंचित रहावे लागते. तसेच त्यांना संपुर्ण आयुष्यात शाळेचे तोंडही पहावयास मिळत नाही. लहान मुलांच्या विकासाच्या मार्गात अडसर बनून राहिलेल्या महत्वाच्या समस्या पुढीलप्रमाणे,

### अ. बालमृत्यू :–

बालमृत्यू ही बालविकासाच्या मार्गातील सर्वात गंभीर समस्या म्हणता येईल. बालमृत्यूमुळे एक जीवन फुलण्यापूर्वीच कोमेजले जाते आणि याची कृष्णछाया संपुर्ण कुटूंबावर पडते. बालमृत्यूच्या बाबतीत मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत जास्तच आहे. जवळजवळ मुलांपेक्षा मुलींमध्ये ते 61 टक्के इतके जास्त आहे. यावरून मुलींच्या आरोग्याची किती हेळसांड होते हे लक्षात येते.

**● बालमृत्यूची कारणे :–**

आपल्या देशात बालमृत्यूचे प्रमाण अधिक आहे, त्याची अनेक कारणे आहेत. त्यातील महत्वाची कारणे पुढीलप्रमाणे,

**1. कुपोषण :–**

कुपोषण हे बालमृत्यूचे महत्वाचे कारण आहे. मुलांच्या निकोप वाढीसाठी आवश्यक असणारे पोषक घटक त्याच्या आहारातून न मिळणे म्हणजेच, 'कुपोषण' होय. देशाच्या आदिवासी भागात व दुर्गम प्रदेशात कुपोषित बालकांचे प्रमाण खूप मोठे आहे.

**2. दारिद्र्य :–**

लहान मुलांवर कुपोषणाची वेळ येते ती म्हणजेच दारिद्र्यामुळे. भारतात आजही दारिद्र्यरेषेखाली जीवन जगावे लागत असलेल्या लोकांची संख्या बरीच मोठी आहे. गरीबीत जीवन जगणाऱ्या लोकांच्या जीवनावश्यक गरजाही पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे इच्छा असूनही ते आपल्या मुलांना पोषक आहार देवू शकत नाहीत.

**3. आरोग्यविषयक सुविधांचा अभाव :–**

ग्रामीण व दुर्गम भागात शहरी भागाच्या तुलनेने आरोग्यविषयक सुविधांची कमतरताच असते. त्यांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे निरनिराळ्या घातक आजारांना ही लहान मुले बळी पडतात.

**4. स्त्रियांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष :–**

स्त्रियांना दुय्यम समजण्याची प्रवृत्ती भारतीय समाजात मोठ्या प्रमाणावर आढळते. त्याचाच एक भाग म्हणजे स्त्रियांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष. स्त्रीच्या आजारपणाच्या काळात, गरोदरपणाच्या काळात तिची पुरेशी काळजी घेतली जात नाही. तिच्याकडे त्या काळातही दुर्लक्ष केल्यामुळे कुपोषित बालके जन्माला येतात.

**5. अज्ञान आणि निरक्षरता :–**

ज्या समाजात निरक्षरतेचे प्रमाण जास्त असते. त्या समाजात बालमृत्यूचे प्रमाण अधिक असते. कारण निरक्षर मातापित्यांना आपल्या लहान मुलांच्या आरोग्याचे रक्षण कसे करावे, याचे शास्त्रीय ज्ञान नसते. त्यामुळे बालकांच्या आरोग्याची काळजी त्यांच्याकडून घेतली जाऊ शकत नाही.

**6. अंधश्रध्दा :–**

भारतीय समाजात अंधश्रध्दा व भोळ्या समजुती मोठ्या प्रमाणात प्रचलित आहेत. आदिवासी भागात, ग्रामीण भागात लहान मुले आजारी पडली की, त्यांच्यावर वैद्यकीय इलाज करण्याऐवजी देवरूषी, भगत, गावठी वैद्य अशा लोकांकडे मुलाला घेऊन जातात. भूतबाधा, जादूटोणा यावर अघोरी उपाय केले जातात, यातूनच मुलांचा अमानूष छळ केला जातो.

**ब. कुपोषण :–**

बालविकासाच्या मार्गातील महत्वाची आणखी एक समस्या म्हणजे कुपोषण होय. भारतातील ग्रामीण समाजात आणि आदिवासी भागात कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात आढळते. लहान मुले व स्त्रिया कुपोषणाला बळी पडतात. बालकाचे योग्य प्रकारे पोषण न होणे म्हणजे कुपोषण मुलांच्या आहारातून त्यांना आवश्यक ती प्रथिने, जीवनसत्वे व उष्मांक मिळाले तर त्यांची निकोप वाढ होऊ शकते. पण मुलांना जेव्हा असा चौरस आहार मिळत नाही, तेव्हा कुपोषणाची समस्या उदभवते

### कुपोषणाची कारणे :—

### 1. दारिद्र्य आणि गरीबी :—

'दारिद्र्य' हेच कुपोषणाचे सर्वात महत्वाचे कारण होय. पालकांच्या गरीबीमुळे ते आपल्या पाल्यास पोषक आहार देऊ शकत नाहीत. त्यामुळे ती कुपोषित बनतात. समाजातील ज्या घटकात गरीबीचे प्रमाण जास्त आहे, त्या घटकातील मुलेच प्रामुख्याने कुपोषणाचे बळी ठरत आहेत. भारतात कुपोषित बालकांचे प्रमाण अधिक असण्याचे कारण म्हणजे देशातील बरीच लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे.

### 2. मातेच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष :—

कुपोषित बालकांपैकी काही मुले जन्मतःच कुपाषित असतात याचे कारण म्हणजे त्यांच्या आईला गरोदरपणाच्या काळात पोषक आहार मिळालेला नसतो. बालकाच्या वाढीची प्रक्रिया गर्भावस्थेपासूनच सुरू होते. मुल जन्माला आल्यावरही काही काळ बाळाची वाढ मातेच्या दुधावर होत असल्याने तिलाही सकस आहाराची गरज असते. पण याबाबतीत आपल्या समाजात पुरेशी जाणीव ठेवली जात नाही.

### 3. आरोग्यविषयक उदासीनता :—

कुपोषणाचे आरोग्यविषयक उदासीनता हे एक महत्वाचे कारण मानले जाते. बालकांना आवश्यक त्या प्रतिबंधात्मक लसी देण्याबाबत लोकांना अजूनही चालढकल करण्याची वृत्ती आहे. त्याचप्रमाणे आजारी बालकांना आजही तातडीने उपचार दिले जात नाहीत. पर्यावरणाचे रक्षण करण्याकडे आपण नेहमीच दुर्लक्ष करतो. परिणामी दूषित पाणी, दूषित हवा यांच्याशी मुकाबला करण्याचा प्रसंग आपल्यावर ओढवितो, त्यामुळे रोगराई पसरते.

### 4. मोठे कुटूंब :—

निरक्षर समाज कुटूंब नियोजनाकडे फारसे लक्ष देत नाही, त्यामुळे एका कुटूंबात सात ते आठ मुले असणे ही सामान्य बाब होऊन जाते. मुख्य म्हणजे दरिद्री कुटूंबातच जास्त मुले असण्याचे प्रमाण अधिक असते. गरीब आईवडील इतक्या मुलांचे पालनपोषण करू शकत नाहीत, त्यातूनच कुपोषणाची समस्या उदभवते.

### क. बालमजुरी :—

बालविकासाच्या प्रश्नाशी निगडीत असलेली आणखी एक समस्या म्हणजे बालमजुरी होय. मानवी जीवनाच्या काही अवस्था मानल्या जातात. साधारण मुलांच्या चौदा वर्षाचा काळ समजला जातो. म्हणून चौदा वर्षाखालील मुले जेव्हा आपल्या उदरनिवार्हासाठी शारीरिक कष्टाची कामे करतात, तेव्हा अशा मुलांना बालमजूर किंवा बालकामगार म्हटले जाते. चौदा वर्षावरील मुलांना शारीरिक कष्टाची कामे करावी लागणे, त्यांच्या शारीरिक क्षमतेला न पेलवतील असे श्रम करण्यास त्यांना भाग पाडणे किंवा अन्य मार्गाने त्यांचे शोषण करणे यालाच बालकामगारीची समस्या म्हटले जाते. अशा मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासावर विपरित परिणाम होतो. जोपर्यंत मुलांचा विकास साधला जात नाही, तोपर्यंत मानवतेच्या सर्व मुलभूत समस्या तशाच कायम राहतील. बालमजुरीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे,

### 1. दारिद्र्य :—

बालमजुरीच्या समस्येचे मूळ मुलांच्या आईवडीलांच्या दारिद्र्यात असते. आज दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या कुटूंबांची संख्या फार मोठी आहे. अशी अनेक कुटूंबे आहेत की, त्यातील प्रौढ सदस्यांनी दिवसभर काबाडकष्ट केले तरी त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून ते आपल्या सर्व कुटूंबाचा उदरनिर्वाह करू शकत नाहीत. त्यामुळे लहान मुलांनाही कामावर पाठवावे लागते.

### 2. मोठे कुटूंब :—

आपल्या देशाला कुटूंबनियोजनाचे महत्व आजही समजलेले नाही. एकाच कुटूंबात चार ते पाच पेक्षा जास्त मुले असणे हे सर्वत्र आढळणारे दृश्य आहे. जर कुटूंब गरीब असेल तर कुटूंबप्रमुख इतक्या मोठ्या कुटूंबाचा भार स्वतःच्या शिरावर पेलू शकत नाही. अशावेळी कुटूंबातील लहान मुलांनाही काम करणे भाग पडते.

### 3. कुटूंबाचे विघटन :–

पती–पत्नीत बेबनाव झाल्याने कुटूंबाचे होणारे विघटन हे ही बालमजुरीचे एक कारण सांगता येते. काही वेळा पती व पत्नी या दोघांनाही मुलांची जबाबदारी घेणे नकोसे वाटते. तसेच मुलांची जबाबदारी घेतलेल्या व्यक्तीने पुनर्विवाह केला तर त्या सावत्रमाता किंवा पित्याचा जाच सहन करावा लागतो. अशा मुलांच्या वाट्याला मजुरी येते.

### 4. व्यसनाधिनता :–

पालकांची व्यसनाधिनता बालमजुरीस कारणीभूत ठरते. आपल्या कमाईचा बराचसा भाग व्यसनावर खर्च केल्याने कौटूंबिक जबाबदाऱ्या क्षमतेने पार पाडता येत नाहीत. कुटूंबप्रमुखाच्या व्यसनाधिनतेमुळे संपुर्ण कुटूंबाची वाताहात होते. त्यामुळे लहान मुलांना काम करावे लागते.

### 5. कर्जबाजारीपणा :–

बरेचदा गरीबीत जीवन जगणाऱ्या लोकांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येते. अशातच कुटूंबातील एखाद्या सदस्याचे आजारपणे, मुलीचे लग्न यासारखी खर्चाची बाब पुढे आली तर त्याला कर्ज काढण्याशिवाय पर्याय नसतो. त्यात हे कर्ज खाजगी सावकाराकडून घेतले असेल तर तो व्याजाच्या बोजाखाली दबून जातो. अशावेळी लहान मुलांना कामावर पाठविण्याशिवाय पर्याय राहत नाही.

### 6. अनाथपणा :–

काही मुलांवर लहान वयातच अनाथ होण्याची वेळ येते. कुणी जवळचे नातेवाईक नसतात. असले तरी ते जबाबदारी घेण्याचे टाळतात. त्यामुळे ही मुले निराधार होतात. त्यामुळे त्यांना कामावर जाण्याशिवाय गत्यंतर नसते.

### 7. मालकवर्गाचा स्वार्थ :–

आपल्या देशात अशी अनेक माणसे आहेत की, त्यांची कोणतेही श्रम करण्याची तयारी असते पण रोजगार मिळत नाही. याचा गैरफायदा मालक वर्ग घेतो. मालकवर्गाच्या दृष्टीने लहान मुलांना कामावर ठेवण्याचा मोठा फायदा असतो. कमी वेतनात त्यांना राबविता येते.

### ड. शिक्षणाची समस्या :–

शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मुलभूत हक्क मानला जातो. शिक्षणाला मानवाचा 'तिसरा डोळा' असे संबोधले जाते. शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य असते म्हणून जगातील सर्वच राष्ट्रे मुलांच्या शिक्षणास अग्रक्रम देतात. आपल्या देशात बरीच लहान मुले शिक्षणापासून वंचित आहेत, ही बाब चिंताजनक आहे. म्हणून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांच्या शिक्षणाची सोय लावणे हे प्रमुख आव्हान आहे.

अशाप्रकारे बालकांच्या विकासामध्ये येणाऱ्या अडथळ्यांचा विचार केला असता, त्यामध्ये प्रामुख्याने बालमृत्यू, कुपोषण, बालमजुरी आणि शिक्षणाचा अभाव या गोष्टींचा अंतर्भाव होतो. ग्रामीण व आदिवासी भागातील बालकांना शहरी बालकांच्या तुलतेन अत्यंत कमी सुविधा मिळतात, त्यामुळे शासनाने या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

### ● समारोप / निष्कर्ष :–

भारताच्या संविधानाने बालकाची संज्ञा स्पष्ट केली आहे. वयाच्या 14 वर्षाखालील सर्वांचा समावेश बालक या संज्ञेत होतो. बालकांच्या सर्वांगिण विकासाकडे पाहिजे तेवढ्या प्रमाणात लक्ष दिले जात नाही. त्यामुळे त्यांच्या विकासात अडथळे निर्माण होतात. उदयाचा समृद्ध समाज निर्माण होण्यासाठी सर्वाधिक लक्ष बालकांच्या विकासाकडे दिले पाहिजे.

कोणताही समाज आणि देश सशक्त करावयाचा असेल तर प्रामुख्याने बालकांचे सशक्तीकरण करणे आवश्यक आहे. सक्तीच्या व मोफत शिक्षणविषयक कायदे प्रत्यक्षात अंमलबजावणीत आले पाहिजेत, बालकांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्व विकासाच्या योजना वास्तवामध्ये राबविणे आवश्यक आहे.

## ● संदर्भ :

**मराठी / हिंदी**

1. आहुजा राम, सामाजिक समस्याऐं, रावत पब्लिकेशन्स, 2000, द्वितीय संस्करण, 2009, जयपूर.
2. पाटील व्ही. बी., मानवी हक्क, के' सागर पब्लिकेशन्स, 2012, (सातवी आवृत्ती), पुणे.

**English**

1. Kaur Gurkirat, Fundamental Rights, Shree Publishers & Distributors, 2006 New Delhi.
2. Kewalramani C. S., Child Abuse, Rawat Publications, 1992, Jaipur.
3. Mustafa Mohd, Omkar Sharma, Child Labour In India – A Bitter Truth, Anmol Publication, 1998, New Delhi.
4. Rai C. P., Child Labour – A Reality Volume 1 & 2, Anmol Publication, New Delhi.
5. Shard Neel K., The Legal Economic and Social Status of The Indian Child, National Book Organization, 1988, New Delhi.
6. Suchinmayee Rachana, Gender, Human Rights & Environment, Atlantic Publishers, 2008, New Delhi.